**नि.दि.दा.क्र. १०५/२०१०**

**निशाणी १९९ वरील आदेश**
(दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ रोजी पारित)

प्रस्तुतचा अर्ज वादीने दाव्यामध्ये दुरुस्तीसाठी दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे थोडक्यात म्हणणे असे की, प्रतीवादी विरुध्द दावा वाटप मिळण्यासाठी प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे.

३. दावा मिळकतीचे गट नं. ७३/१अ व गट नं. ७३/२अ या गटावरील काही हिस्सेदारांची नावे दाव्यात वादीने जाणुन बुजून सामील केलेले नाही असे कथन प्रतिवादीने त्यांच्या कैफियतमध्ये केलेले आहे. त्यामुळे वादीस खालील प्रमाणे दावा दुरुस्त करणे गरजेचे आहे.

४. सदर दावा चालु असताना प्रतिवादी क्र. १७ यांनी दावा मिळकतीच्या काही हिश्याचे दिनांक १५.०५.२०१७ रोजी रजिस्टर वाटपपत्राने बेकायदेशीर वादीच्या हिश्याला बाधा यावी म्हणुन आपसात वाटप पत्र केलेले आहे. सदरचे वाटप हे फेरफार क्र. २३६७ अन्वये झालेले आहे. सदरचे वाटपपत्र झाल्याचे वादीस नुकतेच समजले असल्याने दाव्याच्या पॅरा नं. ६ चे शेवटी पॅरा नं. ६.अ असा आकडा लिहुन खालील मजकुर लिहीण्यास परवानगी असावी.

५. प्रतिवादी क्र. १७ भगवान नबाजी कोकणे यांनी या दाव्याचे कामकाज चालु असताना दावा मिळकतीच्या काही हिश्याचे दिनांक १५.०५.२०१७ च्या वाटप पत्राने प्रतिवादी क्र. २८ व प्रतिवादी क्र. ३२ यांना बोकायदेशीरपणे वाटप

करुन दिले आहे. सदरचे वाटपपत्र या वादीचे हिश्यावर बंधनकारक नाही यासाठी सदरचा दावा दाखल करणे भाग पडले आहे. अशी दुरुसती करण्यास परवानगी असावी.

६. तसेच पॅरा नं. १०.अ.१ हा नविन आकडा लिहुन त्याप्रमाणे खाली प्रमाणे दुरुसती करण्यास पवानगी असावी.

प्रतिवादी क्र. १७ यांनी दिनांक १५.०५.२०१७ च्या वाटपपत्राने प्रतिवादी क्र. २८ व प्रतिवादी क्र. ३२ यांना बेकायदेशीरपणे वाटप करुन दिलेले आहे सदरचे वाटप हे वादीच्या हिश्यावर बंधनकारक नाही असा जाहिर ठराव करण्यात यावा.

७. तसेच पॅरा नं. ६.अ च्या नंतर हा ६.ब नविन आकडा लिहुन पुढील प्रमाणे दुरुस्ती करण्यास परवानगी असावी.

प्रतिवादी क्र. २० यांनी दाव्याचे काम चालु असताना दिनांक ०८.०३.२०१६ रोजी एस आर १७/१६ अन्वये दावा मिळकतीच्या काही हिश्याचे प्रतिवादी क्र. ४४ व प्रतिवादी क्र. ४५ यांच्या नावावर बेकायदेशीरपणे वाटप करुन दिलेले आहे. सदरचे वाटप हे वादीचे हिश्यावर बंधनकारक नाही असा जाहिर ठराव करण्याकरीता सदरचा दावा दाखल करणे भाग पडले आहे. अशी दुरुस्ती करण्यास परवानगी असावी.

दाव्यातील पॅर नं. १०.अ.१ च्या नंतर १०.अ.२ हा नविन आकडा लिहुन त्याप्रमाणे खालील प्रमाणे दुरुस्ती करण्यास परवानगी असावी.

प्रतिवादी क्र. २० यांनी प्रतिवादी क्र. ४४ व प्रतिवादी क्र. ४५ यांना करुन दिलेले वाटप हे बेकायदेशीर असून ते वादीच्या हिश्यावर बंधनकारक नाही असा जाहिर ठराव करण्यात यावा.

८. तसेच सदर दाव्यातील सरनाम्यामध्ये प्रस्तावित प्रतिवादी क्र. २५ ते ४९ समाविष्ठ करण्याची परवानगी मिळण्याचा व त्या अनुषंगाने वादीस दाव्यामध्ये अर्जात नमुद केल्याप्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यासाठी परवानगी मिळण्याचा अनुतोष मागीतला आहे.

९. प्रस्तूतच्या अर्जास प्रतिवादींनी अर्जास जबाब दिला की, वादींनी दाखल केलेला अर्ज खरा, बरोबर व प्रामाणिकपणाचा नाही. प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिताचे कोणत्या तरतुदीप्रमाणे दाखल केलेले आहे हे नमुद केलेले नाही. सन २०१७ च्या कागदपत्राबाबत वादींना माहिती असताना त्यांनी दि. ७.०२.२०१९ रोजी दुरुस्तीसाठी अर्ज दिलेला आहे त्यामुळे सदरचा अर्ज रद्द होण्यास पात्र आहे. जाहिर ठरावाच्या अनुषंगाने दुरुस्ती अर्जात मुद्रांक शुल्काबाबत कोठेही उल्लेख नाही. त्यामुळे सदरील अर्ज रद्द होण्यास पात्र आहे.

१०. अर्जदाराच्या वकीलांचा व प्रतिवादींच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

११. प्रस्तूत अर्जाचे व दाव्याचे अवलोकन केले असता अर्जदार प्रस्तावित दुरूस्ती अन्वये वादी दाव्यामध्ये नजरचुकीने राहिलेले पक्षकार दाव्याच्या अभिलेखास आणु इच्छित आहे. त्याचप्रमाणे दावा प्रलबिंत काळात घडलेल्या बाबी म्हणजेच सन २०१७ साली झालेले वाटणीपत्रा संबधातील मजकुर दाव्याच्या अभिलेखात आणु इच्छीत आहेत. सदर वाटणीपत्रा बाबत त्यांना सन २०१७ पासुन माहिती असल्याचे कोणताही सृकतदर्शनी पुरावा दाव्याच्या अभिलेखात आलेला नाही. वादींनी त्यांना वाटणीपत्राबाबत नुकतेच समजले असल्याचे कथन केलेले आहे. सदर कथनावर विश्वास ठेवणे अशी कोणतीही बाब दाव्याच्या अभिलेखात आलेली नाही. प्रस्तावित दुरुस्तीने दाव्याच्या मुळ

स्वरूपात बदल होत असल्याचे दिसून येत नाही. वादीने प्रस्तावित दुरुस्ती अन्वये कोणतीही कबुली काढून घेतलेली नाही.

१२. दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ६ नियम १७ अन्वये पक्षकांराना दुरुस्ती अर्ज दाखल करण्याचा अधिकार आहे. दिवाणी प्रक्रिया संहितेच्या कोणत्या तरतुदी अंतर्गत दाखल केलेला आहे हे नमुद नसले तरी ते केवळ नमुद केलेले नाही या कारणास्तव अर्ज फेटाळता येणार नाही. त्यामुळे प्रतिवादींच्या अर्जात तरतुद नमुद केलेली नाही म्हणुन अर्ज रद्द करावा या युक्तीवादात तथ्य नाही.

१३. दाव्यामध्ये दुरुस्ती केल्यामुळे प्रतिवादींना अडचणीचे ठरत नाही. प्रतिवादींच्या बचावास कोणतीही बाधा येत नाही. प्रस्तावित दावा दुरूस्तीमुळे प्रतिवादीस काहीएक हानी पोहोचणार नाही. प्रस्तुतच्या दुरुस्तीने दाव्याच्या मूळ स्वरुपात कुठलाही बदल होणार नाही. तसेच प्रतिवादींना कुठल्याही आश्चर्यकारक वस्तुस्थितीचा सामना करावा लागणार नाही. प्रस्तावित दुरुस्ती अर्जान्वये वादी कुठल्याही प्रकारे नवीन केस मांडत नाहीत. दाव्यातील पुढील गुंतागुंत टाळण्यासाठी तसेच वादी व प्रतिवादी यांच्यातील ख—या वादाच्या मुद्यावर निर्णय घेण्यासाठी प्रस्तावित दुरुस्ती अर्ज मंजूर करणे आवश्यक वाटते. तरी वरील सर्व कारणांचा विचार करुन पुढील आदेश पारीत करीत आहे:—

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदारास अर्जामध्ये नमुद केल्याप्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येते.

३. अर्जदाराने दाव्यामध्ये आवश्यक ती दुरुस्ती व त्या अनुषंगाने आवश्यक असणारी कार्यवाही या आदेशाच्या दिनांकापासून १४ दिवासाच्या आत करून घ्यावी.

दौंड.
दिनांक : १३/०९/२०१९

(एन. बी. जाधव)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
दौंड, कोर्ट क्र.१.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file are same word for word as per original.

| | | |
|---|---|---|
| Name of the Court | : | Shri. N. B. Jadhav, Civil Judge Junior Division, Daund [Court No.1]. |
| Name of the Steno | : | Miss. F. J. Bijapure, Steno Grade-3. |
| Judgment date | : | 13/09/2019. |
| Judgment signed by P.O. on | : | 16/09/2019. |
| Judgment uploaded on | : | 16/09/2019. |